**डी.व्ही.एम.ए. नं. - ५८/२०२४**

**<u>नि.क्र १ वरील आदेश</u>**

भारताचे मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली व मा. राष्टीय विधी सेवा प्राधिकरण, दिल्ली यांचे निर्देशाप्रमाणे राष्ट्रासाठी मध्यस्थी ९० दिवस विशेष मोहिम अंतर्गत प्रकरणाचे स्वरुप विचारात घेता व अर्जदार आणि गैर अर्जदार यांच्यातर्फे देण्यात आलेली **नि.क्र.११** वरील पुरसीस अन्वये प्रकरण मध्यस्थ प्रक्रियेतून समेटाने निकाली निघण्याची शक्यता आहे. त्यामूळे हे प्रकरण समेटासाठी विशेष मध्यस्थ मोहिमेमध्ये ठेवण्यात येत आहे.

याद्वारे स्पष्ट करण्यात येते की, मध्यस्थ प्रक्रिया पूर्णपणे गोपनीय राहील. जर मध्यस्थ प्रक्रियेत तडजोड झाली नाही तर त्याचा कुठलाही परिणाम न्यायालयात चालणा-या खटल्यावर होणार नाही तसेच मध्यस्थी दरम्यान केलेली चर्चा व माहिती उघड करणार नाहीत. जर मध्यस्थ प्रक्रियेत प्रकरणात तडजोड झाली तर पक्षकार हे तडजोडीच्या अटी लिखीत स्वरुपात नोंदवतील व त्यावर पक्षकार व वकिल यांच्या स्वाक्षरी केल्यानंतर संबंधित न्यायालयाकडे आदेश पारित करण्याकरिता पाठवले जाईल.

या प्रकरणातील पक्षकारांना नोटिस देउन सूचित करण्यात येते की, त्यांनी आपले ओळखपत्र, संबंधित कागदपत्रे व आपले वकिलासह नोटिसीत नमूद दिनांक व वेळेवर प्रशिक्षीत मध्यस्थ यांच्यासमक्ष उपस्थीत रहावे.

सही/-

दि. ०२/०२/२०२६

(आर. आर.भद्रे )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर,
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
शेवगाव